# भारतीय जनता पार्टी - उत्तर मुंबई

कांती टेरेस, विवेकानंद रस्ता, कांदिवली पश्चिम, मुंबई - 400 067 दूरध्वनी : 28077100 फॅक्स : 28073201


**कृपया प्रसिध्दीसाठी** **26 सप्टेंबर 2008**

## भाजपाचा विस्तार पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या त्यागाचे फळ - राम नाईक

**मुंबई, शुक्रवार :** " आज भाजपा आणि सहयोगी पार्टींची देशात 12 राज्यांमध्ये सरकार सत्तेवर आहेत आणि शंभर वर्षां पेक्षाही जास्त जुनी असलेल्या कॉंग्रेस आणि इतर पक्षांचे केवळ आठ राज्यांमध्ये सरकार आहे. हा भारतीय जनसंघाचे नेता व विचारवंत पं. दीनदयाळ उपाध्याय आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या समर्पण, त्याग आणि बलिदानाचा परिणाम आहे. त्यांच्यामुळेच भारतीय राजकारणाला चांगली नवीन दिशा मिळाली आहे." पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त (25 सप्टेंबर) कांदीवली पूर्व येथील महिला मोर्चा ने आयोजित केलेल्या महिला संमेलनात माजी केंद्रिय मंत्री श्री. राम नाईक यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली.

पारेख हॉल मालाड पूर्व येथे आयोजित केलेल्या महिला संमेलना मध्ये श्रीमती पारुल महेता (सचिव - महाराष्ट्र भाजपा), श्रीमती विंदा किर्तीकर (अध्यक्षा - मुंबई महिला मोर्चा), श्रीमती किरणबेन शहा (अध्यक्षा - उत्तर मुंबई महिला मोर्चा), श्री. जगदिश पटेल (सरचिटणीस - उत्तर मुंबई जिल्हा भाजपा), श्री. ज्ञानमूर्ती शर्मा (नगरसेवक), श्री. विलास शिंदे (अध्यक्ष - कांदिवली पूर्व विधानसभा भाजपा), श्रीमती सुचित्रा नाईक (अध्यक्षा - महिला मोर्चा उ.प. जिल्हा विभाग) यांनी आपले विचार मांडले.

महिला संमेलनाचे आयोजन श्रीमती दक्षा पटेल ( माजी नगरसेविका आणि अध्यक्षा कांदिवली पूर्व विधानसभा महिला मोर्चा) यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन वॉर्ड क्रमांक 41 च्या अध्यक्षा श्रीमती रेखा जोशी व आभार प्रदर्शन कुमारी संगीता राणे (विधानसभा सरचिटणीस) यांनी केले. संमेलनामध्ये कांदिवली पूर्व विधानसभा महिला पदाधिका-यांची घोषणा केली गेली. 300 पेक्षा जास्त महिला कार्यकर्त्या या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

for **(कार्यालय सचिव)**